आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१३ मार्च २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- पोलीस पाटील आणि आशा स्वयंसेविकांच्या मानधनात भरीव वाढ, राष्ट्रीय आरोग्य अभियानातल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम स्वरुपी सेवेत घेण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
- देशात काँग्रेसची सत्ता आली तर सर्वप्रथम महिला आरक्षण लागू करण्याची काँग्रेस नेते राहुल गांधी यांची घोषणा
- देशातल्या, सव्वा लाख कोटी रुपये खर्चाच्या ३ सेमीकंडक्टर प्रकल्पांची प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पायाभरणी
- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ९०६ अंकांची घसरण

  **आणि**
- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात विदर्भाच्या दुसऱ्या डावात आज दिवसअखेर ५ बाद २४८ धावा

**<><><><><>**

राज्यमंत्रीमंडळाची आज बैठक झाली या बैठकीत आज अनेक निर्णय घेण्यात आले. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आशा स्वयंसेविकांच्या मानधनात मासीक पाच हजार रुपयांची वाढ करण्यात आली आहे. पोलीस पाटलांच्या मानधनात भरीव वाढ करण्यात आली आहे. आता पोलीस पाटलांना महिन्याला १५ हजार मिळणार आहेत. त्याचप्रमाणे मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत या दहावर्षात २३ हजार किलोमीटर लांबीचे रस्ते बांधणार असल्याचंही जाहीर करण्यात आलं.

तसंच राष्ट्रीय आरोग्य विभागातल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम स्वरुपी सेवेत घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही घेण्यात आला. या निर्णयामुळे या विभागातल्या

हजारो कर्मचाऱ्यांना लाभ होणार आहे. मराठी भाषेच्या प्रचार, प्रसारासाठी अद्ययावत मराठी भाषा धोरण जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यातल्या लहान शहरांमध्ये अग्निशमन सेवा बळकट करण्यासाठी राज्याच्या १५३ कोटी रुपयांच्या हिश्श्याला केंद्रानं मान्यता दिली असल्यानं लहान शहरांमधली अग्निशमन दलाची कमतरता भरून निघणार आहे.

महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषदेच्या अकादमीसाठी कळवा इथली शासकीय जमीन लवकरंच अधिग्रहीत केली जाणार आहे.

**<><><><><>**

देशात काँग्रेसची सत्ता येताच सर्वात आधी महिला आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेतला जाईल, अशी घोषणा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज धुळ्यात आयोजित महिला हक्क परिषदेत केली. प्रत्येक महिलेच्या बँक खात्यात वर्षभरात एक लाख रुपये थेट जमा करणार, सरकारी नोकऱ्यांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण, प्रत्येक संस्थांमध्ये महिलांची भागीदारी दुप्पट, तसंच आंगणवाड़ी सेविका, आशा सेविका आणि मध्यान्ह भोजन योजनेतल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनात केंद्र सरकारचा हिस्सा दुप्पट केला जाईल, अशा विविध घोषणा काँग्रेसनं या परिषदेत केल्या. क्रांतीज्योती सावित्रिबाई फुले यांच्या जन्मभूमीतून देशभर प्रत्येक जिल्ह्यात महिला आणि मुलींचं वसतीगृह उभारण्याची घोषणाही यावेळी करण्यात आली. जाती निहाय जनगणना करण्याची घोषणा राहुल गांधींनी या सभेत केली.

यावेळी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, महाराष्ट्र प्रभारी एम. चेन्नीथला, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, प्रदेश कार्याध्यक्ष आमदार कुणाल पाटील आदी उपस्थित होते.

भारत जोडो न्याय यात्रेच्या निमित्तानं आज राहुल गांधी यांनी धुळे शहरात रोड शोही केला.

**<><><><><>**

इतर खासगी कंपन्यांना ऑडिओ-व्हिडीओसह बातम्या पुरवणाऱ्या प्रसार भारतीच्या PB शब्द या सेवेचं अनावरण माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर यांनी आज नवी दिल्लीत केलं. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या बातम्यांची सुधारित वेबसाइट आणि सुधारित News on Air app चं लोकार्पणही त्यांनी केलं.

PB शब्द ही सेवा सुरुवातीला वर्षभर मोफत राहील आणि यात विविध ५० श्रेणीत सर्व महत्त्वाच्या भारतीय भाषांमध्ये बातम्या दिल्या जातील, असं ठाकूर यांनी यावेळी सांगितलं. देशाच्या कानाकोपऱ्यातल्या प्रत्येक भाषेत बातम्या देण्यासाठी प्रसारभारती लोकप्रिय आहे. मोबाइलच्या युगातही आकाशवाणी तर्कसंगत असल्याचंही ते म्हणाले.

News on Air app मध्ये आता व्यक्तीगत आवडीच्या बातम्यांना प्राधान्य, ब्रेकींग न्यूजचे नोटिफिकेशन, मल्टीमीडिया कंटेट, लाइव्ह स्ट्रीमिंग, स्थानिक परिस्थितीनुसार बातम्यांची सुविधा उपलब्ध असेल.

बातम्यांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था आणि व्यक्तींसाठी PB शब्द उपयोगाची असेल असं माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू म्हणाले.

**<><><><><>**

दिल्ली मेट्रोच्या चौथ्या टप्प्यासाठी दोन कॉरिडॉरना केंद्र सरकारनं मंजुरी दिली आहे. यासाठी ८ हजार ४०० कोटी रुपय इतका खर्च येणार असून तो केंद्र सरकार, राजधानी दिल्लीचं सरकार आणि आंतरराष्ट्रीय निधी पुरवठेदार

संयुक्तरित्या करणार आहेत. माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर ही माहिती दिली.

**<><><><><>**

निवडणूक रोख्यांची सर्व माहिती केंद्रीय निवडणूक आयोगाला दिल्याचं प्रतिज्ञापत्र स्टेट बँकेनं सर्वोच्च न्यायालयात दाखल केलंय. १२ एप्रिल २०१९ ते १५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान खरेदी झालेल्या आणि रोखीकरण झालेल्या निवडणूक रोख्यांची माहिती बँकेनं दिली आहे. या कालावधीत २२ हजार २१७ निवडणूक रोख्यांची खरेदी झाली. त्यापैकी २२ हजार ३० निवडणूक रोख्यांचं चलनीकरण झालं, असंही बँकेनं सांगितलं आहे. निवडणूक रोख्यांची खरेदीची तारीख, खरेदी करणाऱ्याचे नाव, निवडणूक रोख्यांची किंमत ही माहिती दिल्याचं प्रतिज्ञापत्रात नमूद आहे. याशिवाय या निवडणूक रोख्यांचं चलनीकरण कधी झालं, कोणत्या राजकीय पक्षाला हा निधी मिळाला ही माहिती यात दिली आहे.

**<><><><><>**

नवमतदारांसाठी मेरा पहला वोट देश के लिए हे मतदार जागरूकता अभियान देशभरात सुरू आहे. पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या हर्षद पवार या विद्यार्थ्यानं इतरांनाही मतदान करण्याचं आवाहन केलं आहे.

**बाईट .....हर्षद पवार ( ११ सेंकद)**

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज देशातल्या ३ सेमीकंडक्टर प्रकल्पांची दूरदृश्य प्रणालीद्वारे पायाभरणी केली. गुजरातमधलं ढोलेरा आणि साणंद तसंच आसाममधल्या मोरीगावमध्ये सव्वा लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करुन हे प्रकल्प उभारले जाणार आहेत. येत्या काळात भारत या क्षेत्रात आघाडीचं स्थान मिळवेल,

असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. आयआयटी, आयआयएम यासह १ हजार ८०० हून अधिक राष्ट्रीय संस्था आणि केंद्रीय विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला. प्रधानमंत्र्यांनी आज प्रधानमंत्री सामाजिक उथ्थान आणि रोजगार आधारित जनकल्याण अर्थात पीएम सुरज या पोर्टलचंही उद्घाटन केलं.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज ९०६ अंकांनी कोसळला आणि ७२ हजार ७६२ अंकांवर बंद झाला तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतही ३३८ अंकांची घसरण झाली आणि तो २१ हजार ९९८ अंकांवर बंद झाला. सेन्सेक्स ७३ हजार पातळीच्या तर निफ्टी २२ हजार पातळीच्या खाली गेला. व्यापक प्रमाणावर विक्री झाल्यामुळे शेअर बाजारात मंदी राहिली. मुंबई शेअर बाजारात ऊर्जा, नैसर्गिक वायू, जल आणि इतर सेवा क्षेत्राबरोबरच ग्राहकोपयोगी वस्तू क्षेत्राला या मंदीचा फटका बसला.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबईत वानखेडे स्टेडियमवर सुरू असलेल्या अंतिम सामन्यात आज चौथ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा विदर्भाच्या मुंबई संघाविरूद्ध दुसऱ्या डावात पाच बाद २४८ धावा झाल्या होत्या. विजयासाठी ५३८ धावांचं लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या विदर्भाला विजयासाठी अजूनही २९० धावांची गरज आहे. अक्षय वाडकर ५६ तर हर्ष दुबे ११ धावांवर खेळत आहेत. तत्पूर्वी वाडकरनं करुण नायरच्या साथीत चिवट झुंज दिली. नायरनं ७४ धावांची सुरेख खेळी केली.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचं जागावाटप अंतिम टप्प्यात असून केवळ वंचित बहुजन आघाडीला चार जागा देण्यात संदर्भातली चर्चा बाकी आहे. त्यामुळे तपशील जाहीर केलेला नाही असं राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार गटाचे नेते शरद पवार यांनी आज सांगितलं. ते नाशिकमधे प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

लोकसभेच्या नाशिक मतदारसंघाची जागा ही शिवसेनेच्या ठाकरे गटाकडे राहील, तर दिंडोरीची जागा ही परंपरेप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेसच लढवेल असंही शरद पवार म्हणाले.

**<><><><>**

परिवहन विभागाच्या १८७ इंटरसेप्टर वाहनांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत हिरवा झेंडा दाखवला. या इंटर सेप्टर वाहनांमुळे सुरक्षित प्रवास होण्यास मदत होणार असल्याचं शिंदे यांनी सांगितलं. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वित करावी, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी परिवहन विभागाला दिल्या.

**<><><><>**

भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयाच्या इमारतीचं ऑनलाईन भूमीपूजन आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालं. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातले सर्व मंत्री, उपस्थित होते.

**<><><><>**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या ‘भारत जोडो न्याय यात्रे’ची सांगता येत्या रविवारी मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज उद्यान अर्थात शिवाजी पार्क इथे

संध्याकाळी ५ वाजता जाहीर सभेनं होणार आहे. यासाठी काँग्रेसनं जोरदार तयारी सुरू केली असून या सभेच्या पोस्टरचं आज अनावरण करण्यात आलं.

**<><><><><>**

विदर्भात बहुतांश ठिकाणी, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली तर मराठवाड्यात काही ठिकाणी, कोकणात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीयरीत्या वाढ झाली आहे.

येत्या दोन दिवसात राज्यातलं हवामान कोरडं राहील असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**//<><><><><>//**